# कल्याण डोंबिवली व्हिजन

Year 08 : Issue 4 : Pages : 4 Kalyan, Dist. Thane : Tuesday 30 Nov To 6 Dec 2021 : Price 2.00 : RNI. No. MAHBIL/2014/56983

वर्ष : ०८ * अंक : ४ * पाने : ४ कल्याण, जि. ठाणे, * मंगळवार, ३० नोव्हेंबर ते ६ डिसेंबर २०२१ मूल्य : रु. २.००/- * नोंदणी क्रमांक एमएएचबी आयएल/२०१४/५६९८३

## कोविडच्या धोकादायक नव्या विषाणूला रोखण्यासाठी जे जे आवश्यक आहे ते सर्व करा मुख्यमंत्री यांचे निर्देश

**मुंबई (प्रतिनिधी) :** कोविडच्या दोन्ही लाटांचा आपण चांगला मुकाबला केला आहे, मात्र आता या विषाणूच्या ओमायक्रॉन व्हेरिएंटचे आव्हान चिंता वाढवणारे असून याची घातकता लक्षात घेता कोणत्याही परिस्थितीत संसर्ग वाढू नये म्हणून मुंबईसह सर्व जिल्ह्यांच्या प्रशासनाने अतिशय काळजी घ्यावी. परत एकदा संसर्गाची वाढ झाली तर लॉकडाऊनसारखे पाऊल परवडणारे नाही, त्यामुळे परत लॉकडाऊन होऊ द्यायचा नाही या निर्धाराने नियमित मास्क वापरणे, अनावश्यक गर्दी न करणे, सुरक्षित अंतर पाळणे अशी काही बंधने पाळावीत लागतील असे सांगून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी लसीचे दोन्ही डोस प्रत्येकाने घेणे, विशेषत: विमानतळावरून येणाऱ्या आंतरराष्ट्रीय व देशांतर्गत प्रवाशांची काटेकोर चाचणी करणे या दृष्टीने जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले. यासंदर्भात केंद्राकडून येणाऱ्या सूचनांची वाट न पाहता युद्धपातळीवर जे जे गरजेचे वाटते ते निर्णय घेऊन आवश्यक पाऊले लगेच टाकावीत असेही त्यांनी स्पष्ट केले.



आपल्या सर्वांमधीलच बेसावधपणा वाढला आहे. 'कुछ नही होता यार' असा पवित्रा मोठ्या संकटात टाकू शकतो असे सावधगिरीचे बोल सांगून मुख्यमंत्री म्हणाले की मास्क न वापरणे आणि नियम तोडून अनावश्यक गर्दी करणे यावर काटेकोर कारवाई झालीच पाहिजे असे पहा.

कोरोना विषाणूच्या ओमायक्रॉन या नव्या उत्परिवर्तित प्रकारामूळे संसर्गाचा धोका वाढणार असून त्याला प्रतिबंध घालण्यासाठी कुठल्या उपाययोजना करता येतील याविषयी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दूर दृश्य प्रणालीद्वारे बैठक घेतली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे, वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख, राज्याच्या टास्क फोर्सचे डॉ. संजय ओक, डॉ शशांक जोशी, डॉ.राहुल पंडित, डॉ. अजित देसाई, डॉ.खुस्राव्ह बजान, डॉ.केदार तोरस्कर, डॉ.झहीर अविराणी, डॉ. वसंत नागवेकर, डॉ.नितीन कर्णिक, मुख्य सचिव सीताराम कुंटे, प्रधान सचिव आरोग्य डॉ प्रदीप व्यास, मुख्यमंायांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, मुख्यमंायांचे प्रधान सचिव विकास खारगे आदींची उपस्थिती होती.

राज्य सरकारला दोन वर्षे पूर्ण झाली, यामध्ये प्रशासनातील सर्व अधिकाऱ्यांचा देखील सिंहाचा वाटा आहे त्यासाठी मुख्यमंायांनी बैठकीच्या प्रारंभी सर्व अधिकाऱ्यांना धन्यवाद दिले.

## संदेश पाटील व रसिका पाटील यांनी केले नागरिकांसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन

**डोंबिवली (वैष्णवी माळी) :** गोपीनाथ चौक, महाराष्ट्र नगर, डोंबिवली, पश्चिम येथे ऐतिहासिक, अभ्यासक ,लेखक व प्रेरणादायी वक्ते शिवसेना उपनेते नितिन बानुगडे पाटील, कल्याण लोकसभा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार राजापूर, लाजा राजनजी प्रभाकर साळवी यांचे डोंबिवली नगरीत जल्लोषात स्वागत करण्यात आले.



शिवसेना उपशहर संघटक हरिचंद्र सत्यवान पाटील, शिवसेना प्रभाग क्रमांक ५२ देवीचा पाडा संदेश हरिचंद्र पाटील व शिवसैनिक रसिका संदेश पाटील यांनी खास नागरिकांसाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी डान्स, मॅजिक शो आयोजित करण्यात आले. ज्वलंत विचारांची आपली शिवसेना .

शिवव्याख्याते शिवसेना उपनेते उपाध्यक्ष महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ लेखक नितिन बानुगडे पाटील यांचे ज्वलंत विचार सर्व नागरिकांसमोर मांडण्यात आले यावेळी मोठ्या संख्येने नागरिकांनी गर्दी केली होती. नितीन पाटील यांच्या शब्दाबरोबर नागरिकांच्या टाळ्यांचा गजर झाला. एकच वाक्य छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांवर चालणारे शिवसेना असते. आणि त्यांचे विचार घेऊनच निस्वार्थपणे बारा महिने चोवीस तास काम करणारे फक्त आणि फक्त शिवसेनाच शिवसैनिक काम करत असतात. आज महाराष्ट्रात भगवा फडकला निश्चितच दिल्लीतही भगवा फडकेल असे उद्गार नितीन पाटील यांनी केले. आलेल्या मान्यवरांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

## दक्षिण आफ्रिकेतून डोंबिवलीत आलेला तरुण करोना पॉझिटिव्ह

**मुंबई (प्रतिनिधी):** करोनाचा नवीन आणि आतापर्यंतचा सर्वात घातक व्हेरियंट 'ओमिक्रॉन'मुळे देशभरात धास्ती वाढली असतानाच, देशात आणि राज्यात परदेशातून येणाऱ्या प्रवाशांची तपासणी करण्यात आली आहे.



नुकतेच दक्षिण आफ्रिकेतून दिल्ली- मुंबई आणि नंतर डोंबिवलीत आलेल्या तरुणाची करोना चाचणी पॉझिटिव्ह आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हा तरूण दक्षिण आफ्रिकेतून दिल्लीत आल्यानंतर मुंबईत पोहोचला. सध्या या तरुणाचे नमुने जिनोम सीक्वेंसिंगसाठी मुंबईच्या प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. या तरूणाला करोनाचा नवीन व्हेरियंट ओमिक्रॉनचा संसर्ग झाला आहे की नाही, हे स्पष्ट होऊ शकते. दरम्यान, त्या रुग्णाच्या कुटुंबातील सहा जणांच्या टेस्ट करण्यात आल्या आहेत. यातील एकाचा अहवाल येणं बाकी आहे, तर बाकी इतर जणांचे अहवाल हे निगेटिव्ह आले आहेत. तसेच बाहेरून आलेल्या त्या रुग्णाचा अहवाल येत्या आठवडाभरात मिळेल, अशी माहिती केडीएमसीच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रतिभा पानपाटील यांनी दिली.

## कल्याण इलेक्ट्रिक लोको शेडला ९३ वर्षे पूर्ण

**कल्याण (प्रतिनिधी):** कल्याण येथील इलेक्ट्रिक लोको शेडच्यावतीने २८ नोव्हेंबर रोजी ९३ वा स्थापना दिवस साजरा करण्यात आला. ग्रेट इंडियन पेनिन्सुलर रेल्वे (जीआयपीआर) अंतर्गत उभारण्यात आलेले हे पहिले इलेक्ट्रिक लोको शेड असल्याने या दिवशी कल्याण लोको शेडमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. गेल्या ९३ वर्षांच्या प्रवासात या शेडने १६ विविध प्रकारच्या लोकोमोटिव्हची देखभाल केली आहे. सुरुवातील २१६० एचपी ईए-१ आणि २२३० एचपी ईफ-१ या प्रकारचे डीसी लोकोमोटिव्ह सोपवण्यात आले होते. त्यानंतर या शेडला डब्ल्यूसीएम २, ३ आणि ४ वर्गाचे लोकोमोटिव्ह मिळाले. मुंबई विभागातील प्रचलित असलेल्या १५०० व्ही डीसी कॅटनरीमध्ये काम करण्यासाठी बदलले गेले.

## महागाईच्या निषेधार्थ कॉंग्रेसचे डोंबिवलीत धरणे

**डोंबिवली (खुशी माळी):** महागाईच्या निषेधार्थ कॉंग्रेसच्यावतीने सर्वत्र जनजागरण अभियानातर्गत आंदोलने छेडी जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून डोंबिवली शहर कॉंग्रेस कमिटीच्यावतीने पश्चिमेकडील द्वारका हॉटेलसमोर रविवारी धरणे आंदोलन छेडण्यात



आले. भाजप हटाव, देश बचाव अशी नारेबाजी करतांना कॉंग्रेस पदाधिकारी, कार्यकर्त्यांकडून महागाईप्रकरणी केंद्र सरकारवर हल्लाबोल करण्यात आला. या आंदोलनामध्ये संतोष केणे, रवी पाटील, शशिकांत चौधरी, एकनाथ म्हात्रे, पॉली जेकब, जितेंद्र भोईर यांसह अन्य पदाधिकारी सहभागी झाले होते.

## खासदार श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांचा शिवसेनेत जाहिर प्रवेश

**डोंबिवली (खुशी माळी) :** काटई गावचे माजी सरपंच अर्जुनभाई पाटील यांच्या नेतृत्वा खाली २७ नोव्हेंबर रोजी जनसंपर्क कार्यालयात खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मनसे, भाजपा, राष्ट्रवादी, कॉंग्रेस सर्व पक्षाच्या मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी व महिलांनी शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेनेत प्रवेश केलेल्या सर्वांना शिवबधन बाधून भगवा फडकवन्यात आला.पाचशे हून अधिक लोकांनी शिवसेनेत प्रवेश केला. लोढा हेवन येथील पंजाबी आणि शीख समाजाचे कार्यकर्ते तसेच खर्डी शिळ दावल पाडा विभागातील मुस्लिम समाजाचे कार्यकर्ते यांनी जाहीर प्रवेश केला. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील इतर कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला एवढ्या मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या पक्षातील कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केल्याने अर्जुन पाटील यांनी खासदार साहेबांना मोठे सरप्राइज दिले.आलेल्या सर्वांनी अर्जुन पाटील याच्या



वरचा विश्वास यावेळी दिसला . यावेळी उपजिल्हाप्रमुख राजेश कदम, एकनाथ मामा पाटील, तालुकाप्रमुख प्रकाश म्हात्रे, उपतालुका प्रमुख जिल्हा परिषद सदस्य रमेश पाटील, बंडू पाटील, महिला संघटक कविताताई गावंड,विभाग प्रमुख गणेश जयपाल, हनुमान ठोंबरे,वडवली ग्रामपंचायत माजी सरपंच

जितेंद्र पाटील, भगवान पाटील,नादिवली माजी सरपंच अनिल म्हात्रे, सहाय्यक सचिव नरेश बामा पाटील, काटईचे शाखा प्रमुख शाम पाटील, हरिष भोइर,लोढा हेवनचे शाखा प्रमुख सुभाष पाटील, नगावचे माजी सरपंच बाळाराम पाटील,माजी सद्यस किशोर रसाळ, ,सुनील पाटील,सोमनाथ पाटील,मनोज पाटील,आदी मान्यवर शिसेनेचे सर्व पदाधिकारी ,महिला आघाडी नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमात खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांना भेटण्यासाठी अनेक संघटनाचे ,सदनिकाचे आणि कल्याण डोंबिवली महापालिकेची सत्तावीस गावांचे कर्मचारी आणि कार्यकर्त यांनी खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांची भेट घेऊन आपले प्रश्न मांडले आणि खासदार साहेबांनी सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली.

## संभाव्य ओमीक्रॉन विषाणू प्रादुर्भावाबाबत घाबरु नका पण पूरेपुर खबरदारी व काळजी घ्या !

**महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी**

दक्षिण आफ्रिका येथून आलेला एक ३२ वर्षाचा इसम कोविड पॉझिटिव्ह असल्याचे आढळून आलेले आहे, याबाबतची माहिती महानगरपालिकेस संबंधित लॅब कडून प्राप्त होताच सदर व्यक्तीस संस्थात्मक विलगीकरणात ठेवण्यात आले आहे. सदर इसमाच्या ८ जवळच्या नातेवाईकांची करोना चाचणी केली असता त्यांचे सर्वांचे कोविड चाचणी अहवाल निगेटिव्ह आढळून आले असून सदर बाब दिलासादायक आहे.

सदर रुग्णाची प्रकृती स्थिर असून त्याचे सॅम्पल जिनोम सिक्वेसिंग साठी कस्तुरबा रुग्णालय मुंबई येथे पाठवण्यात आले आहे. परदेशात इतरत्र ओमीक्रॉन या कोविडच्या नव्या विषाणूचा झपाट्याने होणारा प्रादुर्भाव पाहता, महानगरपालिका क्षेत्रातही महापालिकेमार्फत खबरदारी घेण्यात येत आहे. नागरिकांनी घाबरून न जाता मास्क परिधान करणे, सोशल डिस्टंसिंगचे पालन करणे, वारंवार हात धुणे या त्रिसूत्रीचा कटाक्षाने अवलंब करावा व आपले कोविड लसीकरण वेळीच करून घ्यावे व संभाव्य ओमीक्रॉन विषाणू प्रादुर्भावाबाबत न घाबरता पुरेपुर खबरदारी व काळजी घ्यावी, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी व महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. अश्विनी पाटील यांचे मार्फत करण्यात येत आहे.

## हरवले आहे



**बाबासाहेब कोरे**

वय: ७२ वर्षे वर्ण: सावळा, निम गोरा

पत्ता : ए-१०३, ब्रह्मांड कॉम्प्लेक्स, हॉटेल संदीपच्या मागे, कल्याण (प).

पांढरा चेक्स शर्ट आणि खाकी पॅन्ट

राहत्या पत्त्या पासुन सापडल्यास किंवा इतर कोणतीही माहिती मिळाल्यास कृपया या नंबर वर संपर्क करा.

**७०२१६११११९३/ ७९०००२१७९६**

## ६७ वृद्धांना करोना संसर्ग ; खडवली मातोश्री वृद्धाश्रमातील घटना

**कल्याण (प्रतिनिधी) :** मध्य रेल्वेच्या कल्याण-कसारा रेल्वे मार्गावरील कल्याण तालुक्यातील खडवली येथील भातसा नदी काठच्या मातोश्री वृध्दाश्रमातील ६७ जणांना करोनाची लागण झाली आहे. यातील काही वृध्दांना ताप सदृश्य लक्षणे आहेत,



तर काही लक्षणे विरहित आहेत. सर्व वृध्दांना उपचारासाठी ठाणे सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, अशी मााहिती पडघा आरोग्य केंद्रातील अधिकाऱ्याने दिली.

पडघा आरोग्य केंद्राच्या अंतर्गत मौजे सोरगाव येथील मातोश्री वृध्दाश्रम खडवली येथे भातसा नदी काठी आहे. खडवली रेल्वे स्थानकाच्या पश्चिम बाजूला निसर्गरम्य वातावरणात मातोश्री वृध्दाश्रम आहे. विविध

(पान ४ वर)

## संपादकीय...

### सायबर क्राईमब्रँच मुंबई : अदृश्य चेहरे

तंत्रज्ञानात भयंकर वेगाने होणारी ही प्रगती जितकी मानवाच्या प्रगतीसाठी पूरक आहे तितकीच ती त्याच्या वैयक्तिक सुरक्षिततेसाठी घातकही ठरू शकते. सायबर गुन्ह्यांचे हे गुंतागुंतीचे जाळे किती भयानक ठरू शकते याची काही उदाहरणे प्रत्येक गुन्हेगाराची एक विशिष्ट मानसिकता असते यावर बरेच मानसशास्त्रीय संशोधन झाले आहे. बहुतांशी हे गुन्हेगार अगदी तरुण वयातील मुले असतात,विशेषत: भारतात. या मुलांचे शालेय शिक्षणही पूर्ण झाले नसते.देशातील काही विशिष्ट गावं ही सायबर गुन्हेगारांची गावं आहेत. यातल्या प्रत्येक घरातल्या मुला-मुलींना सायबर गुन्ह्यासाठी वडीलधाऱ्यांमार्फत प्रशिक्षित केले जाते. इथल्या समाजात सायबर गुन्ह्यात सहभाग असलेल्या मुलाला लग्नाच्या बाजारात मोठा भाव असतो. मोठ्या परिश्रमाने गुन्ह्याचा शोध शोध लावत पोलिस तिथे पोहोचलेच तरी त्यावेळी हे संपूर्ण गावच रिकामे झाले असते. चेहरे नसलेल्या या गुन्हेगारांचा शोध म्हणूनच गवताच्या पेंडीतून सुई शोधण्यासारखा असतो. या अदृश्य नजरा सोशल मीडियावरील हालचाली घारी सारख्या टिपून आपले सावज शोधतात. यांना बळी पडणारा सगळ्यात मोठा असुरक्षित वर्ग म्हणजे ज्येष्ठ नागरिक, तरुण मुले-मुली आणि एकल स्त्रिया. नुकतीच माझ्या तरुण लेकीच्या बाबतीत एक घटना घडली. इंस्टाग्रामवरील तिच्या अकाउंट वरील फॉलोअर्सची संख्या बघून काही नामांकित कंपन्या आणि स्टार्टअप मंडळी तिला आपल्या उत्पादनांच्या जाहिरातीसाठी संपर्क करतच असतात. याच साखळीत तिला 'झारा इंडिया' या कंपनीच्या नावाने इमेल आला. समोरच्याला कुठलाही संशय येऊ नये इतक्या व्यावसायिक कुशलतेने तयार केलेल्या या मेलच्या माध्यमातून या मंडळींनी माझ्या लेकीशी व्हाट्सअपवर संपर्क साधला आणि ' 'लूकटेस्ट' साठी वेगवेगळ्या ड्रेसेस मध्ये व्हिडीओ लागतील' असे सांगितले. 'कागदोपत्री कुठलाही व्यवहार नसताना व्हाट्सअपवर असे व्हिडिओ इतकी मोठी कंपनी कसे मागेल' हा संशय आल्यावर आम्ही ताबडतोब मुंबई सायबर क्राईम ब्रँचला संपर्क केला आणि त्यांना ही माहिती दिली, त्याच बरोबर 'झारा' कंपनीच्या आऊटलेटलाही संपर्क केला. त्यातून लक्षात आलं की तो ईमेलही बनावट होता आणि ज्या मोबाइल क्रमांकावरून माझ्या लेकीला संपर्क केला जात होता ते क्रमांकही ओडिशा राज्यातील एका महिलेच्या नावावर होते. वेळीच सावध झाल्याने परिस्थिती हाताबाहेर गेली नाही , पण या निमित्ताने सायबर क्राईम ब्रँचच्या पोलीस उपायुक्त डॉ. रश्मी करंदीकर यांच्याशी सविस्तर चर्चा झाली. त्यांनी दिलेली सायबर गुन्ह्यांच्या स्वरूपाविषयीची माहिती ही हादरवून टाकणारी आहे. या गुन्हेगारांचे चेहरे अदृश्य असल्याने गुन्ह्यांचा तपास लावणे हे अतिशय जिकरीचे आणि चिकाटीचे काम असते आणि ते आपला सायबर विभाग कौशल्याने करतच असतो. पण 'माणूस आयुष्यातून उठू शकतो' इतकं गंभीर स्वरूप या गुन्ह्यांच आहे आणि म्हणूनच जनजागृती शिवाय याला पर्याय नाही.

## उल्हास नदीचे पाणी प्रदूषित करणारांवर कारवाई का होत नाही.?

कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात स्थानिक राजकारण तसेच आरोग्याच्या दृष्टीने प्रशासनाकडून न सुटणारे अनेक प्रश्न आहेत त्यात वालधुनी आणि उल्हास नदीतील जल प्रदूषणाचा प्रश्न फार गंभीर आहे. यामुळे अनेकांचे आरोग्य आज धोक्यात आले आहे.

डोंबिवलीत मध्यंतरी रंगीत पाउस पडल्याचे उदाहरण ताजे आहे. हा पाउस स्थानिक एम आय डी सी क्षेत्रातील उद्योगातील वायू प्रदूषणामुळे पडल्याचे तपासात आढळून आले. त्याच प्रमाणे अलीकडेच उल्हास नदीच्या पाण्यात मोठ्या प्रमाणात जल प्रदुषणं होत आहे. त्यामुळे शहरी तसेच ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण झाला आहे. कल्याण डोंबिवली महापालिकेला पाणी पुरवठा करणाऱ्या उल्हास नदीत शेवाळे तसेच हरींतपर्ण ( जलपर्ण) साचल्याने पाणी दुषित झाले. ते शुध्द करावे म्हणून कल्याणच्याच काही पर्यावरणवादी मंडळींनी पाण्यातच बसून जवळ जवळ आठवडाभर आंदोलन केले तेव्हा महापालिका अधिकारी ,एम आय डी सी अधिकारी यांनी तात्पुरत्या स्वरुपात पाणी शुद्ध करून दिले. या घटनेला सहा महिन्याचाही कालावधी उलटत नाही तोच आता या नदीच्या पाण्याला लाल,हिरवा असे रंग येत आहेत .पाण्याला विचित्र उग्र असा वसा येत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. उल्हासनदीच्या शुद्धीकरणासाठी स्थापन झालेल्या 'उल्हासनदी बचाव कृती समिती चांगलीस आक्रमक झाली आहे. समितीने या बाबत महाराष्ट्र प्रदुषणं नियंत्रण मंडळाकडे तक्रार केल्यावर त्यांना जाग आली. आहे. त्यांनी आता पाण्याचे नमुने घेतले आहेत .प्रश्न असा आहे की प्रदुषणं नियंत्रण मंडळाच्या अधिकार्यांना हे आधीच का सुचले नाही. साधारणपणे २०-३५ लाख लोकसंख्येला या नदीच्या पाण्याचा पुरवठा केला जातो. हे त्यांना माहित नाही का ?



कल्याण डोंबिवली बरोबरच या नदीच्या किनाऱ्या लगतच्या गावांचा विकास होत आहे. ग्रामीण भागाचे शहरीकरण होत आहे. त्यात या नदीच्या कमी पाण्याच्या भागात काही अवैध बांधकामे झाल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे नदीचे पूर्वीचे पात्र लहान होऊन काही भागात तर नदीला नाल्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. अशी परिस्थिती वालधुनी नदीच्या बाबतीत अधिक आढळते.

उल्हास नदीत पूर्वी भाजीपाला पिकवला जात असे. मासेमारीही मोठ्या प्रमाणात केली जात असे. गांधारी,सापाड या भागात ही नदी खाडीला मिळते त्या भागात शेतकरी वाफा पद्धतीने पालेभाज्या पिकवत त्याला कल्याणाच्या कृषी मार्केटमध्ये मोठी मागणी असे. पण उल्हासनगर अंबरनाथ बदलापूर ते कर्जत पर्यंतच्या विकास कामात शहरातील सांडपाणी या नदीत सोडले जाऊ लागले उल्हासनगरमध्ये सांडपाणी शुद्ध करण्याची प्रक्रिया केंद्रे कोठेही दिसत नाहीत त्यामुळे उद्योगातील रसायन मिश्रीत सांडपाणी थेट या नदीत सोडले जाते.

शिवसेनेचे शाबीर शेख कामगार मंत्री असताना शहाड गावातच उघड्या गटारातून निर्माण झालेल्या विषारी वायुमुळे गायी. म्हशी कुत्री, मांजरे इतकीच नव्हेतर कावळे,चिमण्या, कोंबड्या. उंदीर, मोठ्या प्रमाणावर मृत्युमुखी पडले. सुमारे पन्नासच्यावर माणसेही मृत्यू पावले, २००च्या वर बाधित झाले याच्या कटू आठवणी आजही त्या गावातील माणसे सांगतात.

या भागातील रिसोर्टचे सांडपाणी ,उद्योगांचे सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता उल्हास नदीत सोडले जात असल्याने. नदीतील मासे नष्ट झाले. मासेमारीचा व्यवसाय पूर्णपणे बंद झाला. केवळ कल्याण तालुक्यातच नव्हे तर ठाणे जिल्ह्यातील फार मोठ्या भागात उल्हास नदीच्या पाण्याचा वापर केला जातो. साधारणपणे ३० ते ३५ लाख लोक नदीच्या पाण्यावर अवलंबून आहे. पण महाराष्ट्र जीवन प्राधिकरण त्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करीत आहे. याला नेमके कोणते अधिकारी जबाबदार आहेत याचा शोध घेतला पाहिजे. उल्हासनगर महापालिका, कल्याण डोंबिवली महापालिक, अंबरनाथ पालिका. तसेच प्रदुषणं नियंत्र मंडळ यांनाच जबाबदार धरले पाहिजे. नदीतील जलपर्णी रसायनमिस्त्रीत पाणी या सबधात यापूर्वीही अनेक तक्रारी आल्या होत्या. ग्रामीण भागात नळाद्वारे पाणी पुरवठा होतो हे पाणी शुद्ध करण्याची महाराष्ट्र जीवन प्राधिकरण किती जबाबदारी पार पडते? त्यांचे जलशुद्धीकरण केंद्र बंद आहे ते सुरु करण्याची जबाबदारी नेमकी कोणाची. यासाठी कायम स्वरूपी यंत्रणा उभी केली पाहिजे. वाढत्या शहरी भागातील सांडपाणी ,उद्योगातील सांडपाणी प्रक्रिया करून बंद गटारातून नदीत सोडले पाहिजे .तसे न करणाऱ्या उद्योगांवर , टेंकर मधून चोरून नदीत रसायन मिस्त्रीत पाणी टाकणाऱ्यावर कारवाई झाली पाहिजे .तरच नदीतील जल प्रदूषणाचा प्रश्न काही प्रमाणात सुटू शकेल.

**विनायक बेटावदकर ९६१९१४८२६०**

## संजय मोरे यांच्या स्वराज्य जनसंपर्क कार्यालयात शहीद जवानांना मानवंदना

**कल्याण (खुशी माळी):** अध्यक्ष संजय मोरे यांच्या स्वराज्य जनसंपर्क



कार्यालयात मानवंदना कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

दि.२६ नोव्हेंबर १९४९ रोजी डॉ-बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला महान संविधान समर्पित केले होते. जगातील सर्वश्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या भारतीय-राज्यघटनेचे महत्त्व अधोरेखित करणारा संविधान दिवस व २६/११ मुंबईवर झालेल्या भ्याड हल्ल्यात शहीद जवानांना मानवंदना देण्यात आली.

त्या निमित्त भारतीय जनता पार्टी मंडल

त्याप्रसंगी परिवहन माजी सभापती सुभाष मस्के, महिला जिल्हा उपाध्यक्ष वंदना मोरे काकी, बीजेपी राज्य परिषद सदस्य संदीप तांबे, मंडल उपाध्यक्ष दिपक गायकवाड, सरचिटणीस नितेश म्हात्रे, अपंग सेल अध्यक्ष मंगेश पवार, समाजसेविका खरात मॅडम, प्रभाग क्रमांक ८८ वार्ड अध्यक्ष सुनिता गरुड, प्रभाग क्रमांक ८७ वार्ड अध्यक्ष सौदे मॅडम, मयुरी पलांडे, उषा कोवे, जयस्वाल मॅडम, बेलदार मॅडम , कदम मॅडम , आप्पा बनसोडे, कल्याण पूर्व सचिव छगन शिंदे, सुनील मोहिते ,रुपेश साळुंखे, संजय दास, अजय भंडारी जितू मुत्तूकन्ना, व विभागातील नागरिक ज्येष्ठ नागरिक, भारतीय जनता पार्टी सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## भारतरत्न स्व.इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त मुथा प्रतिष्ठान तर्फे विविध कार्यक्रमाचे आयोजन

**कल्याण (खुशी माळी) :** भारतरत्न स्व. इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त मुथा प्रतिष्ठान तर्फे छत्रपती शिवाजी महाराज चौक कल्याण येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या नंतर मुथा प्रतिष्ठान याचे अध्यक्ष प्रकाश मुथा यांनी स्व.इदिराजी गांधी यांनी देशासाठी केलेले अफाट कार्य व बलिदान या बद्दल माहिती कार्यक्रमास उपस्थित कलण्या मधील नागरिकांना दिली.

सदर कार्यक्रमात एन.सी.सी विद्यार्थी यांनी पदमार्च करुन भारताच्या तिरंग्याला मानवंदना दिली. सदर कार्यक्रमास अलकाताई आवळसकर, डॉ.गिरीश लटके, संदानंद तिवारी, ओमप्रकाश पांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर कार्यक्रम पार पाडण्यासाठी विशेष मेहनत कोणार्क देसाई अध्यक्ष कल्याण शहर जिल्हा इंटक, जयदीप सानप जिल्हा अध्यक्ष ओबिसी सेल, शिबु शेख जिल्हा अध्यक्ष -श्रीमती सोनिया गांधी ब्रिगेड, फाईज मुल्ला कल्याण शहर अध्यक्ष, श्रीमती सोनिया गांधी ब्रिगेड, निलेश पांडे, विक्रम राठोड, रितेश जाधव यांची उपस्थिती होती.

## चित्रकला स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळणार वाव

<u>ऑनलाइन चित्रकला स्पर्धा च्या उद्घाटन प्रसंगी आमदार राजू मामा भोळे आणि आरोग्यम् धनसंपदा फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री जितेंद्र पाटील यांचे प्रतिपादन</u>

जळगाव - चित्रकला स्पर्धा च्या माध्यमातून विद्यार्थी यांच्या कलागुणांना मोठी वाव मिळेल. त्यामुळे या स्पर्धेतून



चांगले चित्रकार समोर यावे. त्यांच्यासाठी ही स्पर्धा एक चांगले व्यासपीठ आहे, असे प्रतिपादन आमदार राजू मामा भोळे यांनी केले.

एक्सेलंट ड्रॉइंग फाउंडेशन व श्री राजपूत करणी सेना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय ऑनलाइन चित्रकला स्पर्धा च्या शुभारंभ प्रसंगी आमदार राजू मामा भोळे बोलत होते. हा ऑनलाइन सोहळा प्रभात चौकातील महाराणा प्रतापसिंह महाराज यांच्या पुतळ्याजवळ झाला. या स्पर्धेची माहिती एक्से लंट ड्रॉइंग फाउंडेशन चे संचालक सतीश चौधरी यांनी दिली. या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक

आरोग्यम् धनसंपदा फाउंडेशन चे संचालक जितेंद्र पाटील, श्री राजपूत करणी सेनेचे विभागीय अध्यक्ष प्रवीण पाटील, जिल्हाध्यक्ष विठ्ठल सिंग मोरे, जिल्हा उपाध्यक्ष आशिष सिंग हाडा, मंडळ अधिकारी योगेश्वर नानवरे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष प्रवीण सपकाळे यांनी केले.

सूत्रसंचालन श्री राजपूत करणी सेनेचे खानदेश विभागीय कार्याध्यक्ष विलास सिंग पाटील यांनी केले. या वेळी शेतकरी संघटनेचे चोपडा तालुकाध्यक्ष भरत देशमुख, नाजनिन शेख आदी उपस्थित होते.

## नागरिकांना सेवाभावाने आणि तत्परतेने सेवा दिल्यास संविधानाची मुल्य ख-या अर्थाने जोपासली जातील

### महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी

**कल्याण (खुशी माळी) :** नागरिकांना सेवाभावाने आणि तत्परतेने सेवा दिल्यास संविधानाचे मूल्य खऱ्या अर्थाने जोपासले जाईल, असे उद्गार महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आज काढले, आजच्या संविधान दिनानिमित्त महापालिका मुख्यालयात संपन्न झालेल्या कार्यक्रमात त्यांनी हे उद्गार काढले. संविधान दिनानिमित्त आज



महापालिका मुख्यालयात आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, माजी महापौर रमेश जाधव शासनाचे निवृत्त उपसचिव आय.एम. मोरे व उपस्थित अधिकारी/कर्मचारी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली त्याच प्रमाणे, या समयी संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामूहिकरीत्या वाचन करण्यात आले.

त्याचप्रमाणे दि. २६/११/२००८ रोजी मुंबई शहरावर झालेल्या दाहशवादी हल्ल्यात बळी पडलेल्या निष्पाप नागरिकांना आणि दहशदवाद्यांशी लढा देताना शहिद झालेल्या हुतात्म्यांना आदरांजली वाहून मौन पाळण्यात आले, तद्नंतर बहुजन कर्मचारी परिवर्तन संस्था (रजि.) यांच्यामार्फत अत्रे रंगमंदिर, कल्याण येथे भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून भारतीय संविधान गौरव सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमात जेष्ठ संविधान अभ्यासक व घ्ड. विजय निरभवने यांनी उपस्थित मान्यवरांना भारतीय संविधान विषयक मार्गदर्शन केले यावेळी संबोधी सप्तसूर या बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन विजय सरकटे आणि समाधान मोरे यांनी केले.

**संस्थापक संपादक : राजेंद्र वखरे**
**संपादक : महादेव पंजाबी**
**उप संपादिका : वैष्णवी माळी**
पीआरबी कायद्यानुसार संपादकीय व वृत्तपत्रातील मजकुर, जाहिरातीची कायदेशीर संपूर्ण जबाबदारी महादेव पंजाबी यांच्यावर राहील. कायदेशीर बाबीसाठी न्यायक्षेत्र कल्याण.
साप्ताहिकात प्रकाशित झालेल्या वृत्त व इतर मजकूराबाबत काही वाद असल्यास साप्ताहिक प्रकाशित झालेल्या तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत संबंधितांनी त्याची नोंद घ्यावी. त्यानंतर आलेल्या तक्रारीची जबाबदारी व्यवस्थापनाची नसेल. तसेच वार्ताहर, लेखक यांच्या मताशी संपादक व व्यवस्थापन जबाबदार असेलच असे नाही.

नियमित वाचा
कल्याण डोंबिवली व्हिजन

## संक्षिप्त बातम्या

### सुरेश कदम यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**कल्याण (प्रतिनिधी) :** समाजकार्यात नेहमीच अग्रेसर असणारे पत्रकार सुरेश कदम यांचा ६६ वा वाढदिवस दि. २० ऑक्टोबर २०२१ रोजी श्री संत रोहिदास महाराज सभागृह, लोनावळा येथे उत्साहात पार पडला.



यावेळी राम कदम, संजय कदम, विलास कदम, व समस्त कदम परिवाराकडून सुरेश कदम यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

### आदिवासी मुलांसाठी ‘चित्रकला स्पर्धा’

**ठाणे (प्रतिनिधी) :** कै. उषाताई व कै. उमाकांत वासुदेव यांचे स्मरणार्थ संजीवनी आदिवासी ग्रुपतर्फे ‘चित्रकला स्पर्धा’ आयोजित केल्या आहेत. डॉ अंजली पाटील



यांनी आपल्या आईवडिलांच्या स्मरणार्थ ग्रुपच्या २५ आदिवासी शाळांतील एकूण ९५० मुलांसाठी ह्या स्पर्धा प्रायोजित केल्या आहेत.

दिवाळीत या सर्व मुलांना फराळ, उटणे, शांपू, नेल कटर,तांदूळ पीठ, पंचे व चित्रकलेचे साहीत्य देण्यात आले. . उत्कृष्ट स्पर्धकांना प्रमाणपत्र व बक्षीस देण्यात येतील.

### रेल्वेकडून सर्वसामान्यांना दिलासा, या रेल्वे तिकीटाच्या दरात केली मोठी घट

**कल्याण :** काही दिवसांपूर्वी केंद्र सरकारने पेट्रोल डिझेलवरील अबाकरी कर कमी करुन सर्वसामान्यांना दिलासा दिला होता. तसेच खाद्य तेलाच्या किंमतीही कमी केल्या होत्या. आत रेल्वेने प्लॅटफॉर्म तिकीटाचे दर कमी केले



आहेत. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर, लोकमान्य टिळक टर्मिनस, ठाणे, कल्याण आणि पनवेल या स्थानकांवरील प्लॅटफॉर्म तिकीटाची किंमत ५० रुपये इतकी होती. आता हे तिकीट १० रुपयांना मिळणार आहे. कोरोना काळात स्थानकांवर गर्दी कमी होण्यासाठी रेल्वेने या तिकीटांची किंमत वाढवली होती. आता कोरोनाचे प्रमाणे कमी झाल्यानंतर ही दरवाढ मागे घेण्यात आली आहे.

### गुटखा वाहतुक व विक्री करणऱ्यांची आत खैर नाही, गृमंत्र्यांनी दिले कारवाई आदेश

**कल्याण :** महाराष्ट्रात गुटखाबंदी लागू करण्यात आली असून त्याची कठोर अंमलबजावणी सुरु आहे. परंतु इतर राज्यातुन येणारा गुटखा रोखण्यासाठी सीमेवरील तपासणी कडक करण्यात यावी. तसेच अवैध गुटखा वाहतूक व विक्री करणाऱ्याविरुध्द कठोर कारवाई करण्याचे निर्देश



गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी दिले.

गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखू आणि सुपारी, मावा यांसारख्या प्रतिबंधित अन्नपदार्थांचे उत्पादन आणि विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात गृहमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्यांनी हे निर्देश दिले. या बैठकीला अन्न व औषध प्रशासन मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव संजय सक्सेना, अन्न व औषध प्रशासन आयुक्त परिमल सिग, अतिरिक्त पोलीस महासंचालक राजेंद्र सिंग, सहसचिव दौलत देसाई, यांसह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# आमदार गणपत गायकवाड यांच्या पुढाकाराने संविधान दिन सोहळयाचे आयोजन

**कल्याण (खुशी माळी) :** डॉ . बाबासाहेब आंबेडकर लोक हितवर्धक संघ, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती, डॉ बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन अभिवादन समिती तसेच कल्याण पूर्व माता रमाई जयंती महोत्सव समिती या चार संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आणि आमदार गणपत गायकवाड यांच्या पुढाकाराने प्रभाग ड कार्यालयासमोरील डॉ . बाबासाहेब आंबेडकर उद्यानात संविधान दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.




आमदार गणपत गायकवाड यांनी आपल्या प्रास्ताविकात विविध गटा तटात विखुरलेल्या आंबेडकरी समाज बांधवांना किमान २६ नोव्हेंबर या संविधान दिनी तरी एकत्र येण्याचे आवाहन केले .

या सोहळ्यात सुप्रसिद्ध लोक कलावंत योगेश चिकटगावकर यांचे प्रबोधनात्मक संगित प्रधान भारूडे सादर करण्यात आली . आपल्या भारदस्त वाणीने योगेश चिकटगावकर यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर, छत्रपति शिवाजी महाराज, माता रमाई, माता जिजाई यांच्या जिवन पटावर आधारीत गिते सादर करून संविधान सोहळ्याचे महत्व आपल्या गितांतून सांगितले. सलग चार तास चाललेल्या या संविधान दिन सोहळ्यास दलीत मित्र अण्णा रोकडे, देवचंद अंबादे, भारत सोनवणे, सुबोध भारत, शेखर केदारे, केतन रोकडे, पराग मेंढे, अशोक भोसले, सुबोध भारत, महादेव रायभोळे, निलेश शिंदे, मनोज राय, दादाभाऊ अभंग , संजय मोरे , धर्मा वक्ते, गुलाबराव पाटील सर, सुनिता खंडागळे, वंदना मोरे, यशोदा माळी, ललीता मोरे यांचे सह कल्याण पूर्वेतीत विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचा आयोजकांच्या वतीने संविधानाच्या उद्देशीकेची प्रत देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्र संचलन संदीप तांबे यांनी केले.

## कल्याण मध्ये ओरिजन लाऊंस जिमचे उद्घाटन थाटात संपन्न डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या शुभहस्ते जीमचे उद्घाटन

**कल्याण (खुशी माळी) :** दररोज व्यायाम करणे शरीरासाठी चांगले असते. तसेच विविध प्रकारच्या आजारांपासून मुक्ती मिळते. नागरिकांच्या





आरोग्याची काळजी घेत सुमित आवटे यांनी आधुनिक मशीनने सुसज्ज ओरिजनल जिमचे उद्घाटन केले.

कल्याण लोकसभा खासदार श्रीकांत शिंदे, कल्याण पश्चिम आमदार विश्वनाथ भोईर, महानगर प्रमुख विजय साळवी आणि नगरसेवक सुनील वायले यांच्या शुभहस्ते जीमचे उद्घाटन करण्यात आले.

उद्घाटन वेळी सुमित आवटे म्हणाले की, परिसरातील तरुणांना जिमची नितांत गरज आहे. या व्यायामशाळेत ठेवलेल्या विविध प्रकारची मशीनने तरुणांना मोठी मदत होणार आहे. येथे युवक व्यायाम करून शरीर तयार करू शकतात. आजच्या युगात आरोग्य सुरळीत ठेवण्यासाठी व्यायाम आवश्यक आहे. जिममध्ये जाऊन लोकांचे अनेक आजार दूर होतात. सुमित आवटे यांनी सांगितले की, जिममध्ये आधुनिक उपकरणे बसवण्यात आली आहेत. याचा फायदा तरुणांना होणार आहे.

यावेळी आयोजक सुमित आवटे, कोषाध्यक्ष श्री वारकरी प्रबोधन महासमितीचे महाराष्ट्र बळवंत महाराज आवटे, संतोष टेकवडे मित्रपरिवार व कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

## कल्याण पूर्व शिव सेना युवा सेना आयोजित किल्ले स्पर्धेचा बक्षिस वितरण सोहळा संपन्न

### नगरसेवक महेश गायकवाड यांचा उपक्रम

**कल्याण (खुशी माळी) :** शिवसेना नगरसेवक महेश दशरथ गायकवाड यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या शिव सेना युवा सेना पुरस्कृत किल्ले बांधणी स्पर्धेचा पारितोषीक वितरण सोहळा नुकताच अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.



या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा गुरुवारी भानुशाली हॉल मध्ये संपन्न झाला. या स्पर्धे पैकी प्रभाग क्र.८८ संतोष नगर मध्ये घेण्यात आलेल्या स्पर्धेत १) द्वारकानगरी यांनी प्रथम क्रमांक पटकावला. त्यांना रोख-३०००,भेटवस्तू आणि सन्मानचिन्हे देण्यात आले. २) तिसाई कुंज या मंडळाने द्वितीय क्रमांक पटकावला. त्यांना रोख २०००-भेटवस्तू, सन्मानचिन्ह देण्यात आले. ३) गोविंद इन्कलेव्ह या सोसायटीने तृतीय क्रमांक पटकावला. तर स्वराज्य मित्रमंडळाने चतुर्थ व संतोष नगर मैदान मंडळाने मुरुड जंजिरा साकारून पाचवा क्रमांक पटकाविला. यांना प्रत्येकी १०००रोख व भेटवस्तू आणि सन्मानचिन्हे देण्यात आले.

यासमयी व्यासपीठावर सह संपर्क प्रमुख श्री. शरद पाटील, उप शहर प्रमुख श्री. हर्षवर्धन पालांडे, माजी नगरसेवक श्री. शरद पावशे, तसेच श्री. राहुल पाटील, श्री. दिलीप दाखिनकार, श्री. सुभाष ढोणे, सौ. रीना ढोणे, सौ. रोशना पाटील, सौ.स्नेहा जाधव, सौ. विजयाताई पोटे, कु. वैष्णवी सोनवणे, कु. रोहित डुंमने, कु. धनराज पाटील, श्री. भूषण यशवंतराव ,सोबत आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन प्रभाग क्र.८८ शाखाप्रमुख-प्रशांत बोटे, कल्याण पूर्व युवासेना सचिव-कु. मधुर म्हात्रे यांनी केले होते .

## प्रकाश मुथा यांच्या उपस्थितीत संविधान कार्यक्रमाचे आयोजन

### आंतकवादी हल्ल्यात विरगती प्राप्त झालेल्या पोलिस, जवान व नागरिकांना ‘श्रद्धांजली अर्पण’

**कल्याण (खुशी माळी) :** मा.प्रकाश मुथा सचिव महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी यांनी कल्याण छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे संविधान दिवस व २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबई वर झालेल्या आंतकवादी हल्ल्यात विरगती प्राप्त झालेल्या पोलिस, जवान व नागरिकांना ‘श्रद्धांजली अर्पण’ कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन करण्यात आली. तसेच एन.सी. सी मार्फत पदमार्च करुन राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली.

सदर कार्यक्रमास श्रीमती अलकाताई आवळसकर, तानाजी घाग प्रदेश ( अध्यक्ष श्रीमती सोनिया गांधी ब्रिगेड), कोणार्क देसाई (अध्यक्ष कल्याण शहर जिल्हा इंटक ), लालचंद तिवारी (अध्यक्ष कल्याण शहर जिल्हा सेवादल), जयदीप सानप (अध्यक्ष कल्याण शहर जिल्हा ओबिसी सेल), शिबू शेख (अध्यक्ष कल्याण डोंबिवली श्रीमती सोनिया गांधी ब्रिगेड), फाईज मुल्ला (अध्यक्ष कल्याण शहर, श्रीमती सोनिया गांधी ब्रिगेड), मनिष त्रिपाठी (समन्वयक सेवादल), निलेश पांडे, विक्रम राठोड, किशोर जाधव, रिना खांडेकर (महीला अध्यक्षा महाराष्ट्र प्रदेश श्रीमती सोनिया गांधी ब्रिगेड), संगिता भोईर (सचिव महाराष्ट्र प्रदेश ओबिसी सेल), विद्या चव्हाण, शरिफा खान (जिल्हा सचिव महीला श्रीमती सोनिया गांधी ब्रिगेड), सुजाता परब, वंदना जगताप,विजया शिंदे व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

सदर कार्यक्रम पार पाडण्यासाठी कोणार्क देसाई (अध्यक्ष कल्याण शहर जिल्हा इंटक), फाईज मुल्ला (अध्यक्ष, कल्याण शहर श्रीमती सोनिया गांधी ब्रिगेड), निलेश पांडे, विक्रम राठोड, मनिष त्रिपाठी मेहनत घेतली.

## महापालिका क्षेत्रातील मच्छीविक्रेत्यांना केडीएमसीकडून परवाना वितरण

**कल्याण (वैष्णवी माळी) :** कल्याण डोंबिवली महानगर पालिका क्षेत्रातील मच्छीविक्रेत्यांना



केडीएमसीकडून परवाना वितरण करण्यास सुरुवात केली आहे .

आज मच्छीविक्रेता परवाना वितरण कार्यक्रम भाजपच्या वतीने कल्याणतील दामोदर हॉल मध्ये आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी मच्छी विक्रेत्यांनी गर्दी गेली होती. या कार्यक्रमात विधानपरिषदेचे आमदार व कोळी महासंघाचे अध्यक्ष रमेश पाटील, आमदार रवींद्र चव्हाण उपस्थित होते .

दोन्ही नेत्यांनी आम्ही मच्छी विक्रेत्यांच्या पाठीशी उभी असल्याचं सांगितलं .

यावेळी आमदार पाटील यांनी कल्याण मोहने येथिल मंदिरावर केडीएमसी ने कारवाई केली यामुळे जो वाद झाला त्याबाबत बोलताना ज्या अधिकाऱ्यांनी विना परवानगी मंदिर तोडलं त्याला तोडण्याची वेळ आता आलीय असा वादग्रस्त विधान केलं . कार्यक्रमानंतर आमदार पाटील यांनी मंदिरावर कारवाई अधिकाऱ्याला शिक्षा झाली पाहिजे अशी आमची मागणी असून याबाबत पालिका आयुक्तांना भेटणार असल्याचे सांगितले.

दोन दिवसांपूर्वी भाजपच्या तीन नगरसेवकांनी शिवसेनेत प्रवेश केला होता तसेच आणखी काही नगरसेवक शिवसेनेच्या वाटेवर असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. याबाबत भाजप आमदार रवींद्र चव्हाण यांनी विचारल असता त्यांनी येणाऱ्या काळात राजकारण आणि राजकीय घडामोडी या होतच राहतील व त्याच भाजप योग्य प्रकारे उत्तर देईल यात काही शंका नाही अस सांगितले.

## समृध्दी प्रकाशनातर्फे विविध प्रकारच्या पुस्तकांना पारितोषिके देऊन सन्मानित

**कल्याण (खुशी माळी) :** समृध्दी प्रकाशनातर्फे साहित्य क्षेत्रामध्ये दरवर्षी साहितयातील विविध प्रकारच्या पुस्तकांना पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येते. यावर्षी सार्वजनिक वाचनालय कल्याणचे सरचिटणीस भिकू बारस्कर यांच्या गुंफण या कथा संग्रहास संत नामदेव कथा साहित्य पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे.

भिकू बारस्कर यांनी साहित्य क्षेत्रात लघुकथाकार अशी स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. स्त्री मनाचा ठाव घेणाऱ्या १२ कथांची गुंफण या कथा संग्रहात आहेत. एक कथाकार म्हणून बारस्कर यांचा अनुभव संपन्न जाणीवेचा अविष्कार म्हणजेच गुंफण हा कथासंग्रह. ओघवती भाषाशैली, सहज व साध्या शब्दात प्रसंगाची मांडणी मनाची चटकन पकड घेतले. स्त्री मनाचे विविध पैलू उलगडण्याची कला लेखकाने लीलया पार पाडली आहे. त्यांच्या कथांचा शेवट हा नेहमी सुज्ञ वाचकांवर सोपवलेला पहावयास मिळतो. लेखक म्हणून कुठेही स्वत:ची मते लादण्याचा प्रयत्न करीत नाहीत. आजूबाजूच्या सहज घडणाऱ्या प्रसंगातून कथा गुंफलेलया आहेत. त्यांच्या हा कथाविष्कार हृदयात घर करुन जातो. एक लघुकथाकार म्हणून लेखन करीत असतांना प्रत्येक व्यक्तीमध्ये एक कथा दडलेली असते, असे त्यांचे स्पष्ट मत आहे. आत्तापर्यंत त्यांचे ६ कथासंग्रह, २ चरित्र व ३ संपादित पुस्तके प्रकाशित झालेली आहेत.

# मुथा महाविद्यालयात संविधान दिन साजरा

**कल्याण (खुशी माळी) :** इतरांना दोष देण्यापेक्षा स्वत:चे आत्मपरिक्षण करुन आपल्या चुका लक्षात घेतल्याकी ब्लेम गेम बंद होईल आणि ब्लेम गेम बंद झाला की, देशाचे भविष्य उज्जवल होईल असे अप्पर पोलीस आयुक्त दत्तात्राय कराळे यांनी सांगितले. ते कल्याणातील मुथा महाविद्यालयात आयोजित संविधान दिनाच्या कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते. तर ते पुढे म्हणाले की, कायदा व सुव्यवस्थेला खतपाणी घालणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवू नका त्यामुळे शहरातील वातावरण गढूळ होत असल्याची खंत देखील कराळे यांनी कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केली.



कल्याणातील मुथा महाविद्यालयात संविधान दिन आणि २६/११ च्या आतंकवादी भ्याड हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रध्दांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून भारतीय संविधानाच्या उद्देशिकेप्रमाणे भारत हे सार्वभौम, समाजवादी, लोकशाही, धर्मनिरपेक्ष आणि प्रजासत्ताकतेवर प्रकाश टाकत अप्पर पोलिस आयुक्त दत्तात्रय कराळे यांनी संविधानाविषयी मोलाचे मार्गदर्शन उपस्थितांना दिले. तर संविधान बनविण्यात आल्यापासून ते अंमलात आणेपर्यंत संविधानात्मक प्रवासाबाबत महाविद्यालयाचे प्रकाश मुथा यांनी स्वतंत्र पूर्वीच्या इतिहासावर प्रकाश टाकत संविधानाविषयी माहिती दिली. प्रसंगी २६/११ च्या दहशतवादी भ्याड हल्ल्यात शहीद झालेल्या हुतात्म्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात संविधानाचे पूजन करुन करण्यात आली. यावेळी अप्पर पोलीस आयुक्त दत्तात्रय कराळे, मुथा महाविद्यालयाचे संचालक प्रकाश मुथा, माधवी निकम, वेशाली गोखले, सपना दाजिया, दिपाळी कांबळे, मनिष मुथा लालचंद तिवारी आदी उपस्थित होते.

# मतदार नोंदणीसाठी आयुक्तांनी घेतला पुढाकार, स्वत:च्या आवाजात गायले गीत !




**कल्याण (खुशी माळी) :** मतदान हे राष्ट्रीय कर्तव्य असून मतदानाच्या मुलभूत हक्कापासून मतदार राजा वंचित राहू नये म्हणून निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात मतदार नोंदणी अभियान सुरु आहे. या अभियानाला अधिक चालना देण्यासाठी महापालिकेच्या माहिती व जनसंपर्क विभागामार्फत नियोजनबध्द केलेली, दत्तात्रय लदवा लिखित, चला चला..... मतदार नोंदणीला या आशयाचे गीत (गाणे) स्वत:च्या आवाजात गाऊन महापालिका आयुक्तांनी मतदान नोंदणीचे कामात नवचैतन्य जागविले आहे. मतदार नोंदणी अभियानात सहभागी होऊन दि.३० नोव्हेंबर पर्यंत आपला मतदार नोंदणी अर्ज सादर करुन मतदानाचा हक्कद अबाधित राहण्यासाठी मतदान नोंदणी अभियानाला प्रतिसाद देण्याचे आवाहन महापालिका आयुक्तांनी या गीतातून केले आहे.

# सर्फराज मुन्ना रईस यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्‌घाटन थाटात संपन्न

**कल्याण (खुशी माळी) :** भाजपा टिटवाळा मोहोने मंडळ उपाध्यक्ष सर्फराज मुन्ना रईस यांच्या कोकण नगर मधील जनसंपर्क कार्यालयाचे उद्‌घाटन थाटात संपन्न झाले.



प्रभाग क्रमांक ११ बनेली मध्ये रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था आहे. नागरिकांना जाण्यायेण्यास मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागतो. यासोबतच त्याच प्रभागामध्ये मोडणारे कोकण नगर मध्ये देखील अशाच प्रकारची परिस्थिती असल्याचे चित्र नागरिकांच्या डोळ्यासमोर आहे. कोकण नगर परिसरामध्ये मोठ्या संख्येने लोकवस्ती असून तेथील नागरिकांना पिण्याचे पाणी, होत नसलेला वीज पुरवठा जाण्या-येण्यासाठी रस्ते अशा विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. तेथील संपूर्ण परिस्थिती लक्षात घेता तसेच नागरिकांच्या मागणीनुसार सरफराज उर्फ मुन्ना रईस यांनी कोकण नगर मधील रहिवाशांसाठी रस्त्याची तसेच एलईडी लाईट बसवून रस्त्यावरील लाईटची सोय करून दिली आहे. इतकेच नव्हे तर प्रभागातील नागरिकांच्या अडचणी सोडविण्याच्या उद्देशाने सरफराज मुन्ना रईस यांनी कोकण नगर मध्ये जनसंपर्क कार्यालय चालू केले.

माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या शुभहस्ते सरफराज रईस यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्‌घाटन करण्यात आले. उद्‌घाटना वेळी बनेली प्रभाग क्रमांक ११ मध्ये कोरोना काळामध्ये सरफराज रईस यांनी नागरिकांची विविध प्रकारे मदत केली ज्यामध्ये अन्नधान्य वाटप, नागरिकांना गावी जाण्यासाठी ई पास काढून देणे, प्रभाग सॅनिटायझर करणे यासोबत नागरिकांना आर्थिक मदत देखील रईस यांनी केली आहे. याबद्दल माजी आमदार नरेंद्र पवार यांनी रईस यांचे कौतुक करत त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# सार्वजनिक वाचनालय कल्याणतर्फे संविधान दिन संपन्न

**कल्याण (खुशी माळी) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या सहकार्यांच्या अजोड मेहनतीतून साकारलेलं आपलं संविधान आजच्याच दिवशी संविधान सभेने स्विकारलं. या ग्रंथाने इथल्या प्रत्येक माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला.



असा हा संविधान दिन सार्वजनिक वाचनालय कल्याणतर्फे साजरा करण्यात आला. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन संविधानाच्या उद्देशकेच सामुदायिक वाचन करण्यात आले. प्रसंगी वाचनालयाचे सरचिटणीस भिकू बारस्कर, कार्यकारी सदस्य अरुण देशपांडे, निलिमा नरेगलकर तसेच ग्रंथपाल गौरी देवळे वाचकवर्ग व ग्रंथालयाचा कर्मचारी वर्ग मोठया प्रमाणात उपस्थित होता.

त्यावेळी अरुण देशपांडे यांनी भारताच्या संविधानाचे महत्व अधोरेखित करणारे भाषण करुन श्रोत्यांना त्याची माहिती दिली.



# प्रकाश भोईर यांच्या हस्ते पाईपलाईनच्या कामाचा भूमिपूजन सोहळा संपन्न

**डोंबिवली (खुशी माळी) :** महाराष्ट्र नवनिर्माण सेना डोंबिवली शहर अध्यक्ष मनसे नगरसेवक प्रकाश गोपिनाथ भोईर व नगरसेविका सरोज प्रकाश भोईर यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे पाण्याच्या पाईपलाईनच्या कामाचा भूमिपूजन सोहळा संपन्न झाला.



दिनांक २८ रोजी हनुमान मंदिर, सत्यवान चौक, डोंबिवली, पश्चिम, देवीचा पाडा, सत्यवान चौक, बालाजी वाडी, नवीन देवीचा पाडा, गोपीनाथ चौक, महाराष्ट्र नगर या भागातील वाढती लोकसंख्या व भविष्यात वाढणारी लोकसंख्या लक्षात घेऊन विभागात २,४१,४९,०८८ रुपयाचे काम मंजूर करण्यात आले.

शारदा सोसायटी ते जगदंबा माता मंदिर परिसरापर्यंत पाण्याच्या पाईप लाईन टाकण्यात आली. तसेच सत्यवान चौक ते नवीन देवीचा पाडा येथील पाण्याचे लाईन टाकण्याचे भूमिपूजन करण्यात आले. प्रकाश भोईर व सरोज भोईर आपल्या प्रभागातील नागरिकांसाठी अनेक समाजोपयोगी कार्य करत असतात. नागरिकांच्या पाण्याची समस्या भविष्यात उद्‌भवू नये या दृष्टीने पाण्याच्या लाईनचे काम करण्यात आले.

यावेळी प्रकाश भोईर, सरोज भोईर, श्रीकांत वारंगे, संदीप रमा म्हात्रे, समस्त मनसे कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# डोंबिवलीत पारंपरिक पद्धतीने श्रीकृष्ण-तुलसी विवाह सोहळा थाटात





**कल्याण (खुशी माळी) :** कल्याण ग्रामीण परिसरातील काटई गावात माजी सरपंच अर्जुन पाटील यांच्यातर्फे तुळशीच्या विवाह कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता .या कार्यक्रमाला खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांनी उपस्थिती लावली होती खासदार श्रीकांत शिंदे यांनी तुळशी मातेचे पूजन केले.यावेळी कार्यक्रमानंतर ग्रामस्थांनी विविध समस्यांबाबत खासदार श्रीकांत शिंदे यांच्याशी चर्चा करत समाज मंदिर हॉल, स्मशानभूमीसाठी निधी देण्याची मागणी केली .याबाबत बोलताना खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांनी स्मशानभूमीसाठी जागा निश्चित झाल्यानंतर पन्नास लाखांचा निधी देण्यात येईल. तसेच सामाजिक मंदिर हॉल साठी देखील निधी देऊ असे आश्वासन ग्रामस्थांना दिले.

यावेळी श्रीकांत शिंदे यांनी अर्जुन पाटील यांचे कौतुक केले. आपण असेच समाज कार्य करत रहा.या तुळशी विवाह सोहळ्यासाठी शहर प्रमुख राजेश मोरे, उपजिल्हाप्रमुख भरत भोईर, विधानसभा अध्यक्ष एकनाथ पाटील, जिल्हा परिषद सदस्य रमेश पाटील, हनुमान ठोंबरे, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉक्टर ,शिक्षक, इंजिनीयर, पत्रकार,समाजसेवकांचा यांचा सन्मान केला. तुळशी विवाह सोहळ्यात हरिपाठ, लहान मुलांना मनोरंजन, महिलांसाठी होम मिनिस्टर फेम विवेक पोरजी यांनी महिलां होम मिनिस्टर गेम खेळण्यात आला. विजेता महिलेला पैठणी देण्यात आली. तुळशी विवाहाला आलेल्या सर्व महिलांना साडी भेट देण्यात आली.प्रकाश म्हात्रे, बंडू पाटील,शैलेश भोईर, सुभाष पाटील, सरपंच मुकेश पाटील, सुदर्शन पाटील, विश्वनाथ मस्कर, भरत भोईर, विलास पाटील, नरेश पाटील, सुनील पाटील, मनोज पाटील, नकुल गायकर, शाखाप्रमुख शाम पाटील, हरीश भोईर, विलास पाटील ,तुळशीराम चौधरी ,प्रभाकर पाटील ,काशिनाथ पाटील ,प्रशांत पाटील ,सुभाष पाटील, रोहिदास म्हात्रे, वेंकट म्हात्रे, दीपेश पाटील, छत्रपल सिंग, अमोल भोगले, मुकेश पाटील, मुकेश भोईर ,सुनिता फुटाणे, बबन पाटील ,अनिल पाटील ,रणजित संते ,संतोष कालन, सुनील मालणकर ,सुभाष पाटील, हनुमान महाराज ,अनंता महाराज, राम पाटील, पंडित पाटील, विश्वनाथ मस्कर, जय दुर्गामाता युवक भक्त मंडळ व ग्रामस्थ मंडळ काटई, संत गाडगेबाबा महिला हरिपाठ मंडळ काटई ,आधी कार्यकर्ते शिवसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तुळशी विवाहाचे आयोजक अर्जुन पाटील, संगीता अर्जुन पाटील, ऋषिकेश अर्जुन पाटील, प्रियंका अर्जुन पाटील यांनी केले. आलेल्या सर्वांचे आभार व्यक्त केले.

# हरविलेले मोबाईल तक्रारदारांना परत

**कल्याण (प्रतिनिधी) :** म. फुले चौक, बाजारपेठ खडकपाडा व कोळसेवाडी पोलीस स्टेशन हद्दीत हरविलेल्या मोबाईलचा कल्याण विभाग पोलिसांनी शोधा घेऊन सदरचे मोबाईल तक्रारदारांना परत केले आहेत.

याबाबत वृत्त असे की सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याण विभाग कल्याण यांच्या अंतर्गत असलेली म. फुले चौक, बाजारपेठ, खडकपाडाा व कोळसेवाडी पोलीस स्टेशन हद्दीत कल्याण डोंबिवली तसेच कल्याण रेल्वे स्टेशन या ठिकाणी बाहेर जिल्ह्यातून येणाऱ्या लोकांचे सन २०१८, २०१९, २०२० या कालावधीत वेगवेगळया कंपनीचे मोबाईल गहाळ झाल्याने त्यांनी दिलेल्या तक्रारीवरुन संबंधित पोलीस ठाण्यात प्रॉपर्टी मिसिंग अन्वये तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या.

....पान १ वरुन.. **६७ वृद्धांना करोना संसर्ग ;** भागातील १०९ वृध्द येथे वास्तव्यास आहेत. गेल्या आठवडय़ात एका वृध्दाला ताप आला. वातावरण बदलाचा परिणाम म्हणून त्यांच्यावर नियमित वैद्यकीय उपचार करण्यात आले. उपचार करुनही ताप कमी होत नव्हता. या रुग्णाची खासगी करोना चाचणी केंद्रात तपासणी केली असता, तो रुग्ण करोना सकारात्मक आढळला.

पडघा आरोग्य केंद्राला ही माहिती मिळाली. या केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल भोर यांनी वृध्दाश्रमात करोना चाचणीसाठी शिबीर लावले. वृध्द, त्यांचे नातेवाईक, सेवक अशा १०९ जणांची प्रतिजन चाचणी केली. यामध्ये ६१ वृध्द करोना बाधित आढळले. २५ महिला, ३७ पुरुष, पाच कर्मचारी, दोन कुटुंबीय यांचा यात समावेश आहे. बाधित ४१ जणांना विविध व्याधी आहेत. ३० रुग्ण लक्षणे विरहित सामान्य आहेत. गरोदर माता, एका बालिकेचा बाधितांमध्ये समावेश आहे. ६२ रुग्णांपैकी ५९ जणांनी करोना लशीच्या दोन्ही मात्रा घेतल्या आहेत. दाखल १५ रुग्णांचे नमुने जनुकीय गुणसूत्र तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात येणार आहेत, असे सामान्य रुग्णालयातील अधिकाऱ्याने सांगितले. आठ रुग्ण अतिदक्षता विभाग आणि ५९ सामान्य कक्षात दाखल आहेत. करोना रुग्णांमुळे ११३० लोकसंख्या असलेल्या सोरगाव गावाला प्रतिबंधित क्षेत्र घोषित केले आहे. येथे घरोघरी आरोग्य केंद्रातर्फे सव्हेक्षण सुरू केले आहे, असे पडघा केंद्रातील अधिकाऱ्याने सांगितले.

Printed, Published, Owned & Editor - Rajendra Shrawan Vakhare, Printed At SIDDHAKALA PRINT MEDIA & PUBLICATIONS PVT.LTD., PLOT. No. W-230, TTC Industrial Area, Khairne MIDC, Navi Mumbai-Dist. Thane. MAHARASHTRA - 400710 Published From - Flat No 219, First Floor, L.I.G. Blg No 16, Opp - Birla College Chickanghar, Kokan Vasahat, Kalyan (w), Taluka - Kalyan, Dist - Thane. Pin Code - 421 301 - (Maharashtra) Mob. 09987496136, 09619630035, 08655004586 (REGD.NO. MAHBIL/2014/56983 Email - kalyandombivlivision@gmail.com

हे मराठी साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. राजेंद्र श्रावण वखरे यांनी सिध्दकला प्रिंट मिडीया, अॅण्ड पब्लिकेशन प्रा.लि.डब्ल्यू २३०, टीसीसी इंडस्ट्रियल एरिया खैरणे, एमआयडीसी ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१० जि. ठाणे - ४००७१०, येथे छापून फ्लॅट नं. २१९, पहिला मजला, एल.आय.जी. बिल्डींग नं. १६, बिर्ला कॉलेज समोर, चिकणघर, कोकण वसाहत, कल्याण (प.), ता. कल्याण, जि. ठाणे -४२१३०१ येथून छापून प्रकाशित केले (रजि. नं. एमएचबीआयएल २०१४/५६९८३)